# अधिसूचना

क्र.अ.का./उपजि(भु.सं.क्र.३) वि.पा.वि.म.कावि-२०४/२०२०
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
दिनांक -१४/०२/२०२०.

भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९(१)खालील अधिसूचना

**भूसंपादन प्र. क्र. ८/अ-६५/२०१८-२०१९**
**मौजा – चिखली प.ह.नं. ८८ ता. भिवापूर जि. नागपूर**

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) आणि (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना,**क्र.अ.का./उपजि भु.सं.क्र. ३/कावि-८७१/२०१९, दिनांक-३१/०७/२०१९** अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या शेत जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त शेत जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त शेतजमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र.३) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर** यास पदनिर्देशित करीत आहे.



Scanned with CamScanner

अनुसूचि-एक
जमिनीचे वर्णन

गाव :- चिखली, तालुका :- भिवापूर, जिल्हा :- नागपूर

भुसंपादन प्रकरण क्रमांक :- ०८/अ-६५/२०१८-१९ प.ह.नं. ८८.

| अ.क्र. | सर्वे क्र. | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे हे.आर मध्ये.) |
|---|---|---|
| १ | ७९/१ | ०.०२ |
| २ | ८५ | ०.३२ |
| | एकूण | ०.३४ |

अनुसूची–दोन
सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- मोखाबर्डी उपसासिंचन योजना

प्रकल्पकार्याचे वर्णन :- मोखाबर्डी उपसासिंचन योजनेअंतर्गत नक्षी शाखेवरुन निर्गमित लघु कालवा आर-६ सा.क्र.९९४० मी. मातीकाम व बांधकामाकरीता

समाजाला मिळणारे लाभ :- मोखाबर्डी उपसासिंचन योजना गोसेखूर्द राष्ट्रीय प्रकल्पाअंतर्गत असुन योजनेची सिंचन क्षमता निमितीचे उदिष्ट साध्य करणेसाठी कालव्याचे काम पूर्ण करणे आवश्यक आहे. याचा लाभ सार्वजनिक पाणीपूरवठा, उदयोगधंदे व शेतजमीनीला होणार आहे.

**अनुसूची–तीन**

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- **विस्थापीत होत नाही.**

**अनुसूची–चार**
**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

**१. जिल्हाधिकारी नागपूर यांचे पत्र क्र. एलएसी/कार्या -२५/कावि-९६७/२०१९ दिनांक २८-०५-२०१९**

**२. कार्यकारी अभियंता आंभोरा उपसा सिंचन विभाग, भिवापूर यांचे जा.पत्र क्र. १६०६/ चिशा-२/२०१९ दिनांक १४-०५-२०१९**

टिप :- उक्त जमिनीच्या नकाश्याचे **उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र.३) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर** यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

Thakare 18/12

जिल्हाधिकारी
नागपूर



Scanned with CamScanner